# शासकीय तंत्रनिकेतन, खामगांव

जलंब रोड, खामगांव-444303, जि. बुलडाणा (महाराष्ट्र राज्य)
Phone No.- (07263) 295011/22/33 E-mail:- office.gpkhamgaon@dtemaharashtra.gov.in


**महत्वाची सूचना**

क्र : शातनिखा/विवि/शिष्यवृत्ती/2021/1202
दिनांक : 16./07/2021

**विषय : महाडीबीटी पोर्टलवर शिष्यवृत्ती अर्ज भरण्याकरीता वाढीव मुदतीबाबत व त्रुटीमुळे (Sent Back) परत पाठविलेले शिष्यवृत्ती अर्ज विद्यार्थ्यांनी लॉगीनमध्ये चेक करून त्वरीत रिअप्लाय करण्याबाबत .**

वरील विषयास अनुसरुन संस्थेतील सर्व विद्यार्थ्यांना सूचित करण्यात येते की, महाडीबीटी पोर्टलवरील विविध शिष्यवृत्ती योजनांकरीता **विद्यार्थ्यांकडून अर्ज स्विकारण्यासाठी दिनांक 05 ऑगष्ट 2021 पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे** . तरी ज्या विदयार्थ्यांनी अद्यापही शिष्यवृत्तीकरीता अर्ज केलेले नसतील अशा सर्व पात्र विद्यार्थ्यांनी त्वरीत दिलेल्या तारखेच्या आत शिष्यवृत्तीकरीता ऑनलाईन अर्ज करावे व त्याची **एक प्रत स्वत:जवळ जपून ठेवावी** व भविष्यात सूचनेप्रमाणे एक प्रत संस्थेत जमा करावी . **सद्यस्थितीत कोणत्याही विद्यार्थ्याने सदर अर्जाची प्रत संस्थेत आणू नये .**

तसेच ज्या विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती अर्ज केलेले आहेत, अशा सर्व **विद्यार्थ्यांनी स्वत:चे लॉगीन दररोज नियमितपणे तपासावे**. **ज्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती अर्ज (Sent Back) परत पाठविण्यात आले आहेत, अशा सर्व विद्यार्थ्यांनी त्वरीत त्रुटी दुरुस्त करुन अर्ज Re-apply करावा**. तसेच ज्या विद्यार्थ्यांच्या लॉगीनला **Redeem** बटन दिसत आहे अशा विदयार्थ्यांनी **Redeem बटन दाबून प्रक्रीया पूर्ण करावी .**

सदर प्रक्रीया वेळेत पुर्ण न केल्यास आणि त्यामुळे विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती व तत्सम सवलती न मिळाल्यास त्याकरीता विद्यार्थी स्वत: जबाबदार राहतील, याची सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी .

(डॉ.एस.एस.प्रभुणे)
प्राचार्य
शासकीय तंत्रनिकेतन खामगांव

प्रत- माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव -

1. सर्व विभाग प्रमुखांना विद्यार्थ्यांच्या व्हाटसॲप ग्रुपवर टाकण्याकरीता - संगणक अभि./अणुविद्युत अभि./ विद्युत अभि./स्थापत्य अभि./यंत्र अभि/उपयोजित यंत्रशास्त्र/विज्ञान विभाग/कर्मशाळा विभाग
2. प्रोग्रामर यांना संस्थेच्या वेबसाईटवर अपलोड करण्याकरीता.